follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.७२१०५/९९ * वर्ष २५ * अंक २९९ सातारा * बुधवार दि २४ जुलै २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/


# एका महिन्यात ६४ हजारपर्यंतची कमाई कराच्या अधीन नाही

## नवीन कर प्रणालीतील बदलामुळे १७५०० चा नफा होईल




**दिल्ली :** अर्थमंत्र्यांच्या अर्थसंकल्पातील घोषणांनंतर, जर एखाद्या व्यक्तीचे मासिक वेतन सुमारे ६४००० रुपये किंवा ६४५०० रुपये असेल तर त्याला नवीन कर प्रणालीमध्ये कोणताही आयकर भरण्याची गरज नाही. अर्थसंकल्पापूर्वीच्या परिस्थितीत, वार्षिक उत्पन्न ७,५०,००० रुपयांपर्यंत असेल तरच करदात्याला कर भरण्यापासून दिलासा मिळू शकतो.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आयकरदात्यांना दिलासा देत नवीन कर प्रणालीच्या कर स्लॅबमध्ये बदल जाहीर केले आहेत. अर्थमंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात म्हटले आहे की, नवीन दर लागू झाल्यामुळे देशातील सुमारे चार कोटी करदात्यांना १७५०० रुपयांपर्यंत आयकराचा लाभ मिळेल. यासोबतच, अर्थमंत्र्यांनी स्टँडर्ड डिडक्शन आयटम अंतर्गत ५०,००० रुपयांची सूट वाढवून ७५,००० रुपये केली आहे. नवीन कर प्रणाली अंतर्गत ३ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त ठेवण्यात आले आहे. मात्र, ७ लाखांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांना कर भरावा लागणार नाही. याचे कारण आम्ही पुढे सांगू. प्रथम जाणून घ्या यावेळी कर दरांमध्ये काय बदल करण्यात आले?

**आता आपण जाणून घेऊया की किती मासिक उत्पन्नावर कर भरण्याची गरज नाही आणि कोणत्या करदात्यांना १७५०० रुपयांचा लाभ मिळेल?**

अर्थमंत्र्यांच्या अर्थसंकल्पात केलेल्या घोषणांनंतर, जर एखाद्या करदात्याचे वार्षिक उत्पन्न ७ लाख ७५ हजार रुपयांपर्यंत असेल, तर मानक वजावटीचे ७५,००० रुपये वजा केल्यावर त्याचे उत्पन्न वार्षिक ७ लाख रुपये होईल. अशा परिस्थितीत त्याला कोणताही कर भरावा लागणार नाही. याचा अर्थ जर एखाद्या व्यक्तीचे मासिक वेतन सुमारे ६४००० रुपये किंवा ६४५०० रुपये असेल तर त्याला नवीन कर प्रणालीमध्ये कोणताही आयकर भरण्याची गरज नाही. अर्थसंकल्पापूर्वीच्या परिस्थितीत, वार्षिक उत्पन्न ७,५०,००० रुपयांपर्यंत असेल तरच करदात्याला कर भरण्यापासून दिलासा मिळू शकतो.

**७ लाखांच्या उत्पन्नापर्यंत कर का भरला जात नाही?**

नवीन करप्रणालीत केवळ ३ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त असले तरी, ७ लाखांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांनाही कर भरावा लागणार नाही. याचे कारण आयकर कायद्याच्या कलम ८७- अंतर्गत मिळणारी सूट आहे. कलम ८७- नुसार, जर एखाद्या व्यक्तीचे करपात्र उत्पन्न ७ लाख रुपये असेल तर त्याला कर सूट दिली जाईल आणि त्याला कोणताही कर भरावा लागणार नाही.

**८.५० लाखांच्या वार्षिक उत्पन्नावर आयकराचे गणित काय आहे?**

जर करदात्याचे वार्षिक उत्पन्न ८ लाख ५० हजार रुपये असेल, तर स्टँडर्ड डिडक्शनचे ७५,००० रुपये वजा केल्यावर त्याचे उत्पन्न ७,७५,००० हजार रुपये इतके खाली येते. नवीन करप्रणालीनुसार त्याला नवीन दरानुसार २७५०० रुपये आयकर भरावा लागेल. जुन्या दरांच्या आधारे, करदात्याचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपये मानले गेले असते. अशा स्थितीत त्यांना जुन्या दरांनुसार ३५ हजार रुपये कर भरावा लागला असता. अशाप्रकारे अर्थमंत्र्यांनी स्लॅब बदलण्याच्या घोषणेनंतर आता करदात्याचे ७,५०० रुपये वाचणार आहेत.

अर्थसंकल्पात नवीन आयकर दर निश्चित करण्यात आले आहेत

0-3 lakh - Nil
3-7 lakh - 5%
7-10 lakh - 10%
10-12 lakh - 15%
12-15 lakh - 20%
More than 15 lakh - 30%

मानक कपातीची रक्कम ७५,००० पर्यंत वाढवली.

या गणनेच्या आधारे, समजा स्टँडर्ड डिडक्शनची रक्कम ७५ हजार रुपये वजा केल्यावर, करदात्याचे उत्पन्न ९,७५,००० रुपये असेल, तर वरील हिशेबानुसार त्याला ४७,५०० रुपये कर भरावा लागेल. जुन्या परिस्थितीत, ५० हजार रुपयांच्या मानक वजावटानुसार उक्त करदात्याचे उत्पन्न १० लाख रुपये प्रतिवर्ष मानले गेले असते. अशा स्थितीत त्यांना ६० हजार रुपये आयकर भरावा लागला असता. अशा प्रकारे, नवीन दरांच्या घोषणेनंतर करदात्यांची १२,५०० रुपयांची बचत होईल.

## सर्वसामान्यांना दिलासा ; 'नवरत्न' अर्थसंकल्पात युवा भारताचे प्रतिबिंब

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रतिक्रिया



मुंबई : कररचनेत मोठे बदल करून सर्वसामान्यांना दिलासा देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोट्यवधी देशवासियांचा विश्वास सार्थ ठरविला. केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला हा अर्थसंकल्प शेतकरी, महिला, युवा, कौशल्य विकास, रोजगार, पायाभूत सुविधांची उभारणी, शहरांचा विकास अशा विविध नऊ घटकांवर लक्ष केंद्रीत करणारा नवरत्न अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया व्यक्त करतानाच युवकांच्या कल्याणासाठी भरीव तरतूद, रोजगाराला चालना देणारा आणि 'विकसित भारत' संकल्पनेला बळ देणारा असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे सांगितले.

शेतकऱ्यांना बळ

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सलग सातव्यांदा आज केंद्रीय अर्थसंकल्प मांडला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करीत मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, गरीब, महिला, युवा, शेतकरी या घटकांवर भर देतानाच कृषी व संलग्न क्षेत्रांसाठी १.५२ लाख कोटींची तरतूद तसेच शेती क्षेत्रातील उत्पादकता वाढवण्यासाठी डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर पुरविण्याचा निर्णय हा कृषी क्षेत्राबरोबरच शेतकऱ्यांना बळ देणारा आहे. त्याचबरोबर एक कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठी प्रोत्साहन देण्याचा निर्णय हा काळाची गरज असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. राज्य शासनाने देखील महाराष्ट्रात नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी पावले उचलल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

नविन कररचना ही सामान्यांना, नोकरदारांना दिलासा देणारी असून त्याचे मी स्वागतच करतो. या नव्या कररचनेमुळे करदात्यांची संख्याही वाढेल. यातून विकासाला आवश्यक असणारे करसंकलनातही महाराष्ट्रात अग्रेसर राहील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

ग्रामीण भागाचा कायापालट

या अर्थसंकल्पात शेती क्षेत्रातील उत्पादकता, रोजगार व कौशल्य विकास, मनुष्यबळ विकास व सामाजिक न्याय, उत्पादन व सेवा, शहरी विकास, उर्जा संरक्षण, पायाभूत संरचना, संशोधन व विकास, नव्या पीढीतील सुधारणा या नऊ घटकांचा प्रामुख्याने विचार करण्यात आल्याने सर्वसमावेशक असा हा अर्थसंकल्प असल्याचे सांगत ग्रामीण भारताच्या विकासासाठी केलेली २.६६ लाख कोटी रुपयांची तरतूद खेड्यांचा कायापालट करणारी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

५० लाख अतिरिक्त रोजगार

आपला देश युवांचा आहे असे नेहमी म्हटले जाते. त्याचे प्रतिबिंब आजच्या अर्थसंकल्पात पहायला मिळाले असून युवा वर्गासाठी मोठ्या प्रमाणात तरतुदी करण्यात आल्या आहेत पहिल्यांदाच रोजगारासाठी तयार झालेल्या युवकांना एक महिन्याचा भत्ता पहिल्या महिन्यात देण्याचा निर्णय हा युवांसाठी दिलासा देणारा आहे. ५० लाख अतिरिक्त रोजगार निर्माण करण्याचा देखील निर्धार अर्थसंकल्पातून करण्यात आला आहे. यामुळे महाराष्ट्रातील युवकांनाही रोजगाराची मोठी संधी निर्माण होणार आहे.


देशातील ५०० अग्रणी कंपन्यांमध्ये युवकांना इंटर्नशिप संधी मिळणार असून पाच वर्षांत सुमारे एक कोटी तरुणांना याचा फायदा होणार आहे. कौशल्य विकासासाठी जाहिर केलेल्या नवीन योजनेद्वारे राज्य सरकार व उद्योगविश्व यांच्या संयुक्त विद्यमातून ५ वर्षांच्या काळात २० लाख युवकांना कौशल्यविकास प्रशिक्षण देण्यात येणार आहे. मुद्रा योजनेतून दुप्पट कर्ज देण्याचा निर्णयही युवांना सक्षम करणारा आहे.

पायाभूत सुविधांसाठी ११ लाख कोटी

अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांच्या निर्माणासाठी देखील भरीव तरतूद करण्यात आला आहे. देशात पायाभूत सुविधा उभारणी कामात महाराष्ट्र अग्रेसर आहे. अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा उभारण्यासाठी ११ लाख कोटींची भांडवली तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय पायाभूत सुविधांमध्ये होणाऱ्या खासगी गुंतवणुकीला सरकारी धोरणांमधून प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांच्या कामांना अधिक पाठबळ मिळेल असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे. देशभरात रस्तेबांधणीसाठी २६ हजार कोटींचा खर्च केला जाणार असल्याने दळणवळणाचे जाळे मजूबत होणार आहे. देशभरात १२ इंडस्ट्रियल पार्कला नॅशनल इंडस्ट्रियल कॉरिडॉर डेव्हलपमेंट प्रोग्रॅमअंतर्गत मंजुरी देण्याचा निर्णय हा उद्योगक्षेत्राला भरारी देणारा आहे.

देशभरातील २५ हजार गावांसाठी चांगल्या दर्जाचे रस्ते बनवण्यासाठी पंतप्रधान ग्राम सडक योजना टप्पा ४ सुरू करण्याचा निर्णय महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील रस्त्यांच्या विकासासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे. पीएम सूर्यघर मुफ्त बिजली योजनेद्वारे सौर ऊर्जेला चालना मिळणार असून अर्थसंकल्पातील तरतुदी आणि योजनांमुळे महाराष्ट्राच्या विकासात मोठी भर होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## महाराष्ट्राविषयी केंद्राला आकस : आदित्य ठाकरेंची टीका



मुंबई, दि. २३: भाजपप्रणित केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्राचा कुठेही उल्लेख नाही. बिहार आणि आंध्रप्रदेशसाठी मात्र भरीव तरतूद केली आहे. सर्वाधिक कर महाराष्ट्रातून मिळतो. परंतु, केंद्राच्या अर्थसंकल्पात राज्याच्या तोंडाला पाने पुसण्यात आली आहेत. केंद्राला महाराष्ट्राबाबत इतका आकस का, असा खरमरीत सवाल शिवसेना (ठाकरे) नेते, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी एक्स या हँटडवरून उपस्थित करत केंद्र आणि महायुती सरकारवर टीकास्त्र सोडले.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पात आंध्र प्रदेश, बिहारसाठी विशेष निधीची तरतूद केली. महाराष्ट्राचा साधा उल्लेख अर्थसंकल्पात केलेला नाही. महाराष्ट्राबाबत दुजाभाव का? संविधान विरोधी सत्तेला महाराष्ट्राने आळा घातला आहे. भाजपप्रणित सरकारने त्यामुळे सर्वाधिक कर देणाऱ्या महाराष्ट्रावर राग काढला का, असा प्रश्न आदित्य यांनी उपस्थित केला. तसेच दिल्ली समोर लाचारी करणाऱ्या महायुती सरकारला या अर्थसंकल्पातून काय मिळाले. राज्यातील उद्योग परराज्यात पाठवायला, प्रचंड भ्रष्टाचार करून शासनाची तिजोरी रिकामी करायला आणि फोडाफोडीचे राजकारण करायला येते. परंतु, केंद्राकडून ना विशेष पॅकेज, ना निधी, ना हक्काचा वाटा मिळाला. केंद्राकडून निधी आणायला आणि राज्याचे भले करण्याची धमक महायुती सरकारमध्ये नाही, अशी टीका आदित्य यांनी केली.

## खोटी आश्वासंन देणारं लॉलिपॉप बजेट...!
### -आमदार सतेज पाटील यांची बजेटवर प्रतिक्रिया



**कोल्हापूर** - केंद्रातील नेतृत्व महाराष्ट्राचा इतका राग का करते हे कळत नाही. बिहार व आंध्र प्रदेशसाठी जाहीर केलेल्या योजना पाहता हा अर्थसंकल्प या दोन राज्यांसाठीच मांडला असल्याचे दिसतंय. लोकसभा निवडणुकीत तरुणांनी हिसका दाखवल्यानंतर रोजगाराच्या संधीचा खोटा आभास तयार करणारे बजेट मांडलंय. या अर्थसंकल्पातून केंद्र सरकारनं बेरोजगारांना खोटी आश्वासनं तर दिलीच पण सर्वसामान्य घटकांनाही लॉलिपॉप दाखवला आहे. देशात सर्वाधिक कर महाराष्ट्र भरतो. मात्र, या बजेटमध्ये महाराष्ट्राच्या तोंडाला पाने पुसली आहेत. खोटी आश्वासंन देणारं हे लॉलिपॉप बजेट आहे,अशी प्रतिक्रिया विधानपरिषदेतील काँग्रेसचे गटनेते आमदार सतेज पाटील दिली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे एनडीएमध्ये सहभागी असतानाही महाराष्ट्रात एकही प्रकल्प त्यांना आणता आलेला नाही. याउलट नितीश कुमार व चंद्राबाबू नायडू यांनी स्वतः च्या राज्यासाठी लाखो कोटींची तरतूद मिळवलीय. आधीच महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला पळवले जात आहेत. त्यात अर्थसंकल्पातही महाराष्ट्राला डावलून या राज्याचे महत्व कमी करण्याचा केंद्रातील नेत्यांचा डाव आहे. पण, राज्यातील जनता ही सावत्र वागणूक विसरणार नाही. जसा लोकसभेला धडा शिकावला, त्याच पद्धतीनं येणाऱ्या निवडणुकांमध्येही या दुजाभावाचे योग्य उत्तर जनता देईल, अशी प्रतिक्रिया आमदार सतेज पाटील यांनी दिली.

## अर्थसंकल्प देशाला महासत्ता बनवण्याच्या वाटेवर नेणारा : खासदार धनंजय महाडिक



**कोल्हापूर :** आत्मनिर्भर भारत आणि विकसित भारत या संकल्पनेला वेगाने मुर्तस्वरूप देण्यासाठी आजचा केंद्रीय अर्थसंकल्प महत्वाचा आहे. शेतकरी, महिला, नोकरदार, युवक, उद्योजक आणि गोरगरीबांच्या अपेक्षांचा आणि गरजांचा विचार करून, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारमन यांनी हा परिपूर्ण अर्थसंकल्प सादर केला. पायाभूत सुविधांसाठी ११ लाख कोटी रूपयांची तरतुद म्हणजे देशाच्या विकासाचा भक्कम पाया आहे. तर शेतकर्यांनाही या अर्थसंकल्पातून मोठा दिलासा मिळाला आहे. रोजगार, कौशल्य विकास, शिक्षण, शहरीविकास, गरीबांसाठी घरकुल, महिला सक्षमीकरण, अल्पसंख्यांक मागास घटकांचा विकास अशा सर्व मुद्दयांचा समावेश असलेला मोदी सरकारचा हा अर्थसंकल्प देशाला महासत्ता बनवण्याच्या वाटेवर नेणारा आहे.

## कृषी क्षेत्रात डिजीटल प्लॅट फार्मपेक्षा पायाभूत सुविधा देणे गरजेचे : राजू शेट्टी.



**जयसिंगपूर :** केंद्र सरकारने आज जाहीर केलेला अर्थसंकल्प निराशाजनक असून कृषी क्षेत्रात डिजीटल प्लॅटफॉर्म करण्यापेक्षा पायाभूत सुविधा देणे गरजेचे होते. एकीकडे तेलबिया व डाळीच्यांबाबतीत स्वयंपुर्णतेवर भर द्यायचा व परदेशातून तेलबिया व डाळी आयात करायचे यामुळे शेतक-यांचे सर्वाधिक नुकसान होत असल्याची प्रतिक्रिया स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी आजच्या अर्थसंकल्पावर व्यक्त केली.

केंद्र सरकारने शेती क्षेत्रास भरीव तरतूद करणार असल्याचा डांगोरा पिटविला मात्र शेतक-यांच्या पदरात काहीच पडले नाही. मागील पाच वर्षातील केंद्र सरकारच्या शेतीच्या बजेटचा आढावा घेतला तर २०१९ साली ५.४४ टक्के असणारी तरतूद २०२४ साली ३.१५ टक्के इतकी खाली आलेली आहे. देशामध्ये ६० टक्के लोक हे शेतीवर अवलंबून असून दिवसेंदिवस शेतीचे बजेट मध्ये कपात करून शेतीक्षेत्राकडे दुर्लक्ष केले जात आहे. केंद्र सरकारने शेतीक्षेत्रावरील खर्चाची श्वेतपत्रिका काढून शेतक-यांकडून होत असलेली खरेदी व शेती उत्पन्नातून व प्रक्रिया उद्योगातून किती जीएसटी मिळतो याचा लेखाजोखा जनतेसमोर मांडावा म्हणजे दुध का दुध व पाणी का पाणी समोर येईल. यामुळेच कृषीक्षेत्राचा दर ४.७ टक्क्यांवरून १.४ टक्क्यांनी घसरून ३.३ टक्यापर्यंत खाली येवू लागला आहे. सदरची बाब ही गंभीर असून यामुळेच शेतक-यांच्या आत्महत्या वाढू लागलेल्या आहेत.

केंद्र सरकार अर्थसंकल्पातील तरतुदी केल्यानंतर त्याची अमलबजावणी होण्यासाठी आयात निर्यात- धोरण , पायाभूत सुविधा , शेतीमालावरील प्रक्रिया उद्योग याबाबतीत स्थिर धोरण ठेवले पाहिजे हे या सरकारकडून होत नसल्याचे स्पष्ट दिसून येवू लागले आहे. साखर , कांदा , तांदूळ , सोयाबीन , इथेनॉल , दुध पावडर , डाळी , कापूस , यावरील आयात निर्यातीचे चुकीचे धोरण यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शेतक-यांना कोणत्याही मदतीची गरज नाही उलट बाजारात त्यांना विक्री व प्रक्रियेसाठी संधी उपलब्ध करून दिले पाहिजे. केंद्र सरकारकडून अनेक पिकासाठी हमीभावाची घोषणा केलेल्या आहेत मात्र देशातील फक्त ६ टक्के शेतक-यांना हमीभाव मिळतो उर्वरीत ९४ टक्के लोक हमीभावापासून वंचित आहेत. याकरिता सरकारने हमीभावाचा कायदा अंमलात आणला पाहिजे.

## काय झालं स्वस्त

* मोबाईल फोन
* मोबाईल चार्जरवरील सीमाशुल्कात १५ टक्के कपात
* चामड्याच्या वस्तूंना जीएसटीमधून सूट
* प्लॅटिनमवरील सीमाशुल्क ६.४ टक्क्यांनी घटवलं
* सोने-चांदीवरील सीमाशुल्क ६ टक्क्यांनी घटवलं
* कर्करोगावरील उपचारांसाठीची ३ औषधं सीमाशुल्कातून वगळली

## काय झालं महाग

* अमोनियम नायट्रेट्रवरील सीमाशुल्क १० टक्क्यांपर्यंत वाढवलं.
* नॉन बायोडिग्रेडेबल प्लॅस्टिकवरील सीमाशुल्कात २५ टक्क्यांपर्यंत वाढ
* टेलिकॉम क्षेत्राशी संबधित यंत्रसामग्रीवरील सीमाशुल्कात १५ टक्क्यांपर्यंत वाढ
*१२ महिन्यांपेक्षा जास्त काळाच्या शेअर्सवरील करामध्ये १२.५ टक्क्यांपर्यंत वाढ
*एक वर्षापेक्षा कमी काळाच्या इक्विटी गुंतवणुकीवरील करामध्ये २० टक्क्यांपर्यंत वाढ

## कॅबिनेट निर्णय : आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका यांच्यासाठी मोठी घोषणा, १० लाखांचा अपघाती विमा जाहीर !

आशा स्वयंसेविका अंगणवाडी सेविका यांच्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत मोठा निर्णय घेण्यात आला. आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, गटप्रवर्तकांना सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय शिंदे सरकारने घेतला असून, अपघाती मृत्यू आल्यास दहा लाख आणि अपंगत्वासाठी पाच लाख रुपये अनुदान देण्यात येणार आहे. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. यासाठी प्रति वर्षी अंदाजे १ कोटी ५ लाख रुपये इतका निधी मंजूर करण्यात आला. हा निर्णय १ एप्रिल २०२४ पासून लागू करण्यात येईल. सध्या ७५ हजार ५७८ अशा स्वयंसेविका आणि ३६२२ गटप्रवर्तक कार्यरत असून त्या आरोग्यासंदर्भात महत्त्वपूर्ण जबाबदारी सांभाळतात. हे करताना अपघाती मृत्यू आल्यास किंवा अपंगत्व आल्यास त्यांना आर्थिक सहाय्य

## / गुन्हे वृत्त... /

### कार अपघातात एक ठार तर पाच जखमी

**कराड :** कराड तालुक्यातील ओंड हद्दीतील एका पेट्रोल पंपाजवळ झालेल्या अपघातात एक महिला ठार तर पाच जण जखमी झाले आहेत. जखमींना येथील कृष्णा हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार गाडीत एकूण सहा जण होते. सदर कुटुंबीय हे कामोठे मुंबई येथील असुन भोसले व मोरे कुटुंबातील असल्याचे समजते. देवदर्शनासाठी गुरु पौर्णिमेनिमित्त नाणीज या ठिकाणी ते गेले होते. मुंबईला परत जाताना ओंड या ठिकाणी त्यांच्या कारचा भीषण अपघात झाला.

अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला तर पाच जण जखमी झाले. जखमीना कृष्णा चॅरिटेबल हॉस्पिटल कराड येथे दाखल करण्यात आले आहे. यातील चौघांची प्रकृती गंभीर आहे.

### अपघात प्रकरणी दुचाकी चालकावर गुन्हा

**सातारा :** अपघात प्रकरणी दुचाकी चालकाविरोधात सातारा तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, गोजेगाव, ता. सातारा गावच्या हद्दीत रहिमतपूर-सातारा रस्त्यावर झालेल्या दोन दुचाकींच्या अपघात प्रकरणी प्रतीक सुधीर मस्के (वय २०, रा. गोडोली, सातारा) याच्या विरुध्द सातारा तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अपघातात महिला सौ.भाग्यश्री महेश क्षिरसागर व त्यांची मुलगी अंजली क्षिरसागर (वय १३, दोघी रा. गोजेगाव) या जखमी झाल्या. ही घटना दि. १६ जुलै रोजी घडली आहे.

### अवैधरित्या दारु विक्री प्रकरणी महिलेवर गुन्हा

**सातारा :** लिंब ता.सातारा येथे दारु विक्री प्रकरणी महिलेवर सातारा तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, महिलेकडून पोलिसांनी ९४५ रुपये किंमतीच्या ९० बाटल्या जप्त केल्या आहेत. ही कारवाई २१ जुलै रोजी करण्यात आली आहे.

राहत्या घरातून महिला बेपत्ता

**सातारा :** राहत्या घरातून एक महिला बेपत्ता झाल्याची फिर्याद सातारा शहर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, गणेश चौक, सातारा येथून सौ.रिंकू दशरथ यादव (वय २७, रा. गणेश चौक) ही महिला बेपत्ता झाली आहे. ही घटना दि. २० जुलै रोजी घडली असून पती दशरथ यादव यांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. कोणाला काहीही न सांगता पत्नी निघून गेली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

### चौथ्या मजल्यावरुन पडून एकाचा मृत्यू

**सातारा :** चौथ्या मजल्यावरुन पडल्याने एकाचा मृत्यू झाल्याची नोंद सातारा शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, पारसनीस कॉलनी, सातारा येथे चौथ्या मजल्यावरुन पडून ब्रिजलाल रामपती चौधरी (वय ३२, सध्या रा. गोडोली मूळ रा. मध्यप्रदेश) यांचा मृत्यू झाला. घटनेनंतर उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरु असताना त्यांचा मृत्यू झाला. ही घटना दि. २१ जुलै रोजी घडली असून सातारा शहर पोलिस ठाण्यात याची नोंद झाली आहे.

### कोयत्याने वार करुन एकाला जखमी केल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा

**सातारा :** मिरवणूकीत झालेल्या वादाच्या कारणातून कोयत्याने वार करुन जखमी केल्याप्रकरणी चौघांवर शाहूपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सूरज उंबरकर, सागर उंबरकर, प्रेम यादव, अनोळखी एकजण यांच्या विरुध्द श्रेयश अनिल पाटील (वय १९, रा. करंजे पेठ, सातारा) या युवकाने पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. याबाबत अधिक माहिती अशी, ही घटना दि. २० जुलै रोजी घडली आहे. मिरवणूकीत मुलांची भांडणे झाल्यानंतर ती सोडवण्यात आली होती. मात्र त्या गैरसमजातून संशयित युवकांच्या टोळक्याने कोयत्याने व लाथा बुक्क्यांनी मारहाण करत जखमी केले. यावेळी संशयितांनी पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यास बघून घेतो, असे म्हणत धमकी दिली. दरम्यान, ही घटना मोळाचा ओढा व कोटेश्वर मैदान येथे घडली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

### गोरेंवरील आरोप गांभीर्याने घ्या: उच्च न्यायालय

**सातारा :** माणचे आमदार जयकुमार गोरे यांच्यावरील आरोप गांभीर्याने घ्या, तुम्ही स्वत लक्ष घाला अशा सूचना मुंबई उच्च न्यायालयाने सातार्‍याचे पोलीस अधीक्षक समीर शेख यांना केल्या.

करोना काळात मृत रुग्णांना जिवंत दाखवून अनुदान लाटल्याचा आरोप करत मायणी येथील मेडिकल कॉलेजचे संचालक दीपक देशमुख यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून या सुनावणीसाठी उच्च न्यायालयाने सोमवारी समीर शेख यांना हजर रहाण्यास सुनावले होते. या प्रकरणाची नियमित सुनावणी सुरु झाली असून यामुळे आमदार गोरे अडचणीत येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. नुकत्याच झालेल्या राज्याच्या पावसाळी अधिवेशनात देखील या प्रश्नावर चर्चा झडली होती.

### बिस्मिल्ला सय्यद यांची पारगाव खंडाळ्यास बदली

**वडूज :** येथील राज्य परिवहन महामंडळ आगार प्रमुख म्हणून निलेश माने यांची नियुक्ती करण्यात आली असून नुकताच शनिवार दिनांक २० रोजी त्यांनी आगार व्यवस्थापक पदाचा कार्यभार स्वीकारला. वडूजच्या यापूर्वीच्या आगार प्रमुख श्रीमती बिस्मिल्ला सय्यद यांची पारगाव खंडाळ्यास बदली करण्यात आली आहे. नूतन आगार प्रमुख माने यांच्याकडून खटाव तालुक्यातील जनतेसह आगारातील कर्मचार्‍यांच्याही मोठ्या अपेक्षा असून माने यांनी वडूज आगारात हजर होऊन पदभार स्वीकारल्याबद्दल महाराष्ट्र कामगार संघटना वडूज आगार शाखेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला व त्यांच्या कामकाजाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

उत्तम नियोजनाद्वारे वडूज आजाराचा नावलौकिक वाढवण्याचा प्रयत्न करू, अशी प्रतिक्रिया यावेळी माने यांनी यावेळी व्यक्त केली.

### गोरेंवरील आरोप गांभीर्याने घ्या: उच्च न्यायालय

सातारा : माणचे आमदार जयकुमार गोरे यांच्यावरील आरोप गांभीर्याने घ्या, तुम्ही स्वत लक्ष घाला अशा सूचना मुंबई उच्च न्यायालयाने सातार्‍याचे पोलीस अधीक्षक समीर शेख यांना केल्या.

करोना काळात मृत रुग्णांना जिवंत दाखवून अनुदान लाटल्याचा आरोप करत मायणी येथील मेडिकल कॉलेजचे संचालक दीपक देशमुख यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून या सुनावणीसाठी उच्च न्यायालयाने सोमवारी समीर शेख यांना हजर रहाण्यास सुनावले होते. या प्रकरणाची नियमित सुनावणी सुरु झाली असून यामुळे आमदार गोरे अडचणीत येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. नुकत्याच झालेल्या राज्याच्या पावसाळी अधिवेशनात देखील या प्रश्नावर चर्चा झडली होती.

# सद्गुरू यशवंत बाबा मंदिरात गुरु पौर्णिमेनिमित्त सिद्धेश्वर कुरोली येथे भाविकांची मोठी गर्दी



वडूज : खटाव तालुक्यातील सिद्धेश्वर कुरोली येथील लाखो भाविकांचं श्रद्धास्थान असलेल्या सद्गुरू परमहंस यशवंत बाबा महाराज यांचा पुण्यतिथी उत्सव दिनांक ७ जुलै ते १३ जुलै अखेर मोठया उत्साहात संपन्न झाला. यामध्ये दिनांक १२ जुलै रोजी महारिंगन तर १३ जुलै रोजी रथोत्सव संपन्न झाला. त्यानंतर रविवारी २१ जुलै रोजी गुरु पौर्णिमेनिमित्त आश्रम ट्रस्टच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं. यामध्ये सकाळी श्रीचा अभिषेक व आरती, त्यानंतर गुरु महात्म्य विषयावर हभप गजानन बुवा कुरोलीकर यांचं नारदीय कीर्तन, दुपारी गुणवंत विद्यार्थी सत्कार कार्यक्रम, त्यानंतर दुपारी साडेबारा वाजता पुष्पवृष्टी कार्यक्रम. जयराज कलशी पुणे यांचं सुश्राव्य गायन, हभप गणेश महाराज डांगे यांचं कीर्तन, सायंकाळी यशवंत बाबा महिला भजनी मंडळ यांचं भजन आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले. दिवसभर भाविकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर ठेवण्यात आलं.संपूर्ण दिवस भर सद्गुरू यशवंत बाबांचा आशीर्वाद व दर्शन घेण्यासाठी भाविकांच्या भर पावसात ही लांब रांगा लागल्या होत्या. आ जयकुमार गोरेंच्या सुविद्य पत्नी सोनियाताई गोरेंनी सद्गुरू यशवंत बाबा समाधी स्थळी भेट देवून दर्शन घेतलं. सर्व भाविकांना चहा व महाप्रसाद वाटप करण्यात आला. श्री गजानन कुंभार, नंदकुमार गोडसे, कुमार शेटे, राजू देशमुख, बापू शेटे, सुदाम सुतार, जनार्दन मोरे, विनायक खाडे, ए के माने, आदी नियोजन कमिटी सदस्यांनी कार्यक्रमाचं नियोजन केलं.

सद्गुरू यशवंत बाबा महाराज हे सर्वांचं श्रद्धास्थान असून आश्रम समाधी स्थळ बांधकाम आणि इतर सोयी सुविधा देण्यासाठी भाविकांनी सढळ हाताने सहकार्य करण्याचं आवाहन गजानन बुवा यांनी केलं.

# कोल्हापूर - रत्नागिरी महामार्ग बंद



**कोल्हापूर :** जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला असून ७९ बंधारे पाण्याखाली गेले आहेत. पंचगंगा नदी पाणी पातळी ३९ फुटावर अली आहे. ४३ फूट धोका पातळी असल्याने खबरदारी म्हणून अनेक कुटुंबांना स्थलांतरित करण्यात आले आहे दरम्यान पुराचे पाणी रत्नागिरी महामार्गावर आल्यामुळे पोलिसांनी या मार्गावरील वाहतूक दुपारी दोन वाजले पासून पूर्णपणे बंद केलीय.

पावसाचा जोर वाढल्याने आज (मंगळवारी) सकाळीच या रस्त्यावर पुराचे पाणी आले होते. त्यानंतर काही काळ या महामार्गावरील वाहतूक पाण्यातूनच सुरु होती. मात्र पाणी अर्धा फुटावर वाढले असून पाण्याचा वेग प्रचंड असल्यामुळे या मार्गावरील वाहतूक दुपारी दोन वाजल्यापासून पूर्णपणे बंद केली आहे. त्यामुळे या मार्गावरील अनेक वाहने खोळंबली आहेत.

हा महामार्ग बंद झाल्याने वाहने केर्ली येथून जोतिबा - दाणेवाडी - वाघबीळ या पर्यायी मार्गाने वळवण्यात आलीयत. दरम्यान कोल्हापूर - रत्नागिरी महामार्गावरील आंबेवाडी, रेडेडोह, रजपूतवाडी, चिखली फाटा या ठिकाणी रस्त्याच्या कडेला पाणी लागले आहे. याठिकाणी रस्त्यावर एक दोन फूट पाणी आलं तर केर्ली जोतिबा वाघबीळ हा पर्यायी मार्ग सुद्धा वाहतुकीसाठी बंद होण्याची शक्यता आहे.

कोल्हापूर जिल्ह्याची तहान भागवणारे राधानगरी धरण पाणलोट क्षेत्रात देखील मुसळधार पाऊस सुरू असून गेल्या २४ तासात सर्वाधिक ६६.१ मिमी पावसाची नोंद करण्यात आली आहे.

धरण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत असल्यामुळे राधानगरी धरण देखील आता ९०% भरलेल असून धरणाच्या विद्युतविमोचनातून १५०० क्यूसेक्स पाण्याचा विसर्ग भोगावती नदीपात्रात सुरू आहे.

### शेततळ्यात पडून युवतीचा मृत्यू

**तासगांव :** मणेराजूरी -रामलिंगनगर येथील स्नेहल तुकाराम तोडकर या बावीस वर्षीय युवतीचा शेततळ्यात पडून आकस्मित मूत्यू झाला हा प्रकार मंगळवारी सकाळी उघडकीस आला ,सोमवार दुपारपासून ती बेपत्ता होती .

याबाबत घटनास्थळ व तासगांव पोलीसांच्याकडून समजलेली माहिती अशी की ,रामलिंगनगर येथील स्नेहल तुकाराम तोडकर ही २२ वर्षीय युवती सोमवारी दुपारपासून बेपत्ता होती काल दुपारपासून नातेवाईकांनी सर्व ठिकाणी शोधाशोध केली परंतु ती आढळून आली नाही मंगळवारी सकाळी घरापासूनच हजार ते दीड हजार फुटावरील संपत विठ्ठल जमदाडे यांच्या शेततळ्यात तिचा मृतदेह आढळला या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली.

# घरफोडी करणारे दोघे जेरबंद; १३ लाख ९३ हजार २८० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**कोल्हापूर :** घरफोडी करणाऱ्या दोघा रेकॉर्डवरील गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ताब्यात घेतले आहे . रियाज इमाम कुचनूर आणि बजरंग रामचंद्र चौधरी (दोघे राहणार इचलकरंजी)अशी त्यांची नावे असून पोलिसांनी त्यांच्याकडून १३ लाख ९३ हजार २८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे .

स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना घरफोडी करणारे दोघे आरोपी चोरीचे दागिने विक्रीसाठी हुपरी इथं येणार असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी घरफोडी करणाऱ्या कबनुर इथं राहणाऱ्या दोघा रेकॉर्डवरील गुन्हेगारांना ताब्यात घेतलंय. रियाज कुचनूर आणि बजरंग चौधरी अशी त्यांची नावे असून पोलिसांनी त्यांच्याकडून १३ लाख ९३ हजार २८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केलाय. पोलिसांनी त्यांच्याकडून इचलकरंजी शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दोन तर शहापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एक गुन्हे उघडकीस आणले आहेत.

कारवाई पोलीस निरीक्षक रवींद्र कळमकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शेषराज मोरे,अतीश म्हेत्रे, सतीश जंगम,संजय कुंभार,प्रशांत कांबळे,अमित सर्जे महेश खोत सागर माने राजू कांबळे सुनील पाटील सचिन बेंडखळे यांनी केली.

# वडार समाज वैकुंठ स्मशानभूमीचं मान्यवरांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न

वडूज : आमदार जयकुमार गोरे यांच्या माध्यमातून व वडूज ता. खटाव येथील नगरपंचायत प्रभाग क्रमांक ८ चे नगरसेवक सोमनाथशेठ जाधव यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर झालेल्या वडार समाज वैकुंठ स्मशानभूमीच्या कामाचे भूमिपूजन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झालं.

आ. जयकुमार गोरेंच्या माध्यमातून वडूज नगरपंचायत प्रभाग क्रमांक ८ मध्ये वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून २५ लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला असून वडूज येथील वडार समाज वैकुंठ स्मशानभूमी बांधकामाचे भूमिपूजन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झालं.

यावेळी नगरसेवक सोमनाथशेठ जाधव, माजी ग्रामपंचायत सदस्य रामचंद्र जाधव, अरविंद (मामा) जाधव, माजी उपसरपंच परेश जाधव, शैलेश बाबा जाधव, सतीश चव्हाण,अरुण जाधव,जयवंत जाधव, चंद्रकांत जाधव, सुनील जाधव, चंद्रकांत संपत जाधव, निलेश जाधव अंकल , सचिन जाधव , किरण जाधव अजित जाधव, सनी जाधव, किरण दत्तात्रय जाधव, शशिकांत जाधव, अशोक जाधव, नारायण जाधव, आकाश जाधव, आप्पा माने, प्रथमेश जाधव, रवींद्रशेठ काळे, नगरसेवक जयवंत पाटील, सचिनशेठ माळी, शशिभाऊ पाटोळे, ओंकार चव्हाण, श्रीकांत (काका) बनसोडे, अभय देशमुख, संजय गोडसे, श्रीकांत काळे, गणेशशेठ गोडसे, तानाजी वायदंडे आदींची उपस्थिती होती.

# खडकवासला धरण ८५% भरलं

## मुठा नदीत होणार पाण्याचा विसर्ग, नदी पात्रात सतर्कतेचा इशारा




**पुणे :** पुण्यामध्ये पावसाचा जोर वाढला आहे. मागील आठवड्याभरापासून शहरामध्ये आणि आसपासच्या परिसरामध्ये जोरदार पाऊस सुरु आहे. त्यामुळे पुण्याचा पाण्याचा प्रश्न मिटला आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण क्षेत्रामध्ये देखील पावसाने तुफान बँटिंग केली आहे. त्यामुळे खडकवासला धरण ८५ टक्के भरले आहे. त्यामुळे शहरी भागातून वाहणाऱ्या मुठा नदीमध्ये पाण्याचा विसर्ग सोडण्यात येणार आहे. यामुळे नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

पुण्यामध्ये जोरदार पाऊस असल्याने शहराला ऑरेंज अलर्ट देण्यात आला होता. मात्र पावसामुळे शहराचा पाणीप्रश्न संपला आहे. आज (दि.२३ जुलै) खडकवासला धरण ८५ टक्के क्षमतेने भरले आहे. तसेच पाऊस चालू असून सतत वाढत आहे. अशी परिस्थिती राहिल्यास गरजेनुसार खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून नदी पात्रामध्ये पुढील २४ ते ४८ तासात पाण्याचा विसर्ग सुरू करण्याची दाट शक्यता आहे. यामुळे पुणे महानगरपालिका व पोलीस प्रशासन यांनी योग्य ती दक्षता घ्यावी अशी विनंती खडकवासला पाटबंधारे विभागाकडून करण्यात आली आहे.

पुण्यातील नदी पात्राचा वापर देखील पुणेकर मोठ्या प्रमाणामध्ये करत असतात. नदी पात्रामध्ये वाहन देखील पार्क केलेली असतात. त्यामुळे खडकवासला पाटबंधारे विभागाकडून पालिकेला पूर्वसूचना देण्यात आली आहे. नागरिकांना पूर्वसूचना देण्यात यावी असे देखील विभागाने सांगितले आहे. तसेच सर्व नागरिकांना याद्वारे सतर्क करण्यात येते की कृपया नदी पात्रात कोणीही उतरू नये आणि पात्रात तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावेत. कृपया सखल भागातील संबंधित नागरिकांना सूचना देण्यात याव्यात व सर्वांनी योग्य ती खबरदारी व दक्षता घ्यावी, असे खडकवासला पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा स्थगित



**कोल्हापूर :** अतिवृष्टीमुळे शिवाजी विद्यापीठअंतर्गत सोमवारी होणारी परीक्षा स्थगित करण्यात आली होती. परंतु, पावसाचा जोर कायम राहिल्याने आज, मंगळवार व उद्या, बुधवार या दोन दिवसांच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्याची माहिती विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून अतिवृष्टी सुरू आहे. त्यामुळे नदी, नाले, ओढे तुडुंब भरून वाहत आहेत. परिणामी, वाहतुकीस अडथळा येत असल्याने विद्यार्थ्यांना परीक्षेला येण्यास त्रास होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यार्थीहित लक्षात घेता शिवाजी विद्यापीठाने आज, मंगळवार आणि उद्या, बुधवारी होणाऱ्या सर्व विषयांच्या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. पुढे ढकललेले पेपर कधी होणार या संदर्भातील माहिती यथावकाश शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. तरी महाविद्यालय व विद्यार्थ्यांनी पेपर पुढे ढकलले आहेत, याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा विभागाकडून करण्यात आले.

# नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**सांगली :** सांगली शहरात पुन्हा पुराचा धोका निर्माण झाल्याने महापालिकेने नदीकाठच्या वस्त्यांमध्ये नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. कृष्णेची पाणीपातळी २५ फुटांवर गेल्याने कधीही स्थलांतर करावे लागेल, अशी सूचना नदीकाठच्या नागरिकांना देण्यात आली आहे. सांगलीच्या आयर्विन पुलाजवळील पाणीपातळी गतीने वाढत आहे. रविवारच्या तुलनेत सोमवारी सकाळपर्यंत तब्बल आठ फुटाने पाणीपातळी वाढली. रात्रीत वाढलेल्या पाण्यामुळे पुराचा धोका निर्माण झाला आहे.

तीस फुटांवर पाणीपातळी गेल्यानंतर नदीकाठी असलेल्या सूर्यवंशी प्लॉट, इनामदार प्लॉट, कर्नाळ रोड वरील शिव मंदिर परिसर, काकानगर, दत्तनगर, मगरमच्छ कॉलनी या भागांमधील नागरिकांचे स्थलांतर करावे लागते. त्यामुळे महापालिकेचे आयुक्त शुभम गुप्ता यांनी सोमवारी तातडीने आपत्ती व्यवस्थापनाची बैठक घेऊन अधिकारी, कर्मचाऱ्यांना सतर्कतेच्या सूचना दिल्या.



मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# महाबळेश्वरात पावसाची सेन्चुरी

## पावसाचा पुन्हा जोर सुरूच २४ तासात ९ इंच विक्रमी पाऊस. पर्यटकाची संख्या रोडावली

**महाबळेश्वर :** महाबळेश्वर तालुक्यात धुवाधार पाऊस तर पाऊसाच्या माहेरघरात पाऊसाचे शतक पूर्ण महाबळेश्वर तापोळा रस्त्यावर वाघेराच्या जाळी जवळ दरड माती रस्त्यावर काही वेळ वाहतुक ठप्प झाल्यावर बांधकाम विभागाकडून अवघ्या दोन तासात मार्ग सुरळीत करण्यात आला तर महाबळेश्वर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा दुधोशी शाळे ची भिंत कोसळली असल्याची प्राथमिक माहिती मिळत असून शाळेला पावसाळी सुट्टी असल्यामुळे कोणातीही हानी नाही मात्र शाळेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे महाबळेश्वर तालुक्यात २४ तासात २४१ .0 मि मी (९ इंच )पावसाची नोंद करण्यात आली असून महाबळेश्वर परिसरातील जनजीव विस्कळीत झाले आहे महाबळेश्वरात पाऊसाने आज अखेर पर्यत २५६0.५0 मि मी (१00.८0 इंच) पाऊस पडल्याची माहिती हवामान विभागातून देण्यात आली



महाबळेश्वर शहर व परिसरात पावसाने पुन्हा एकदा जोर धरला असून धुवाधार बरसणाऱ्या पावसाने जनजीवन विस्खळीत झाले असून शहरपरिसरात मोठ्या प्रमाणात विजेचा लपंडाव सुरूच. रविवारी दुपारी विद्युत पुरवठा खंडित झाला होता तो रात्री अकरा वाजता सुरळीत करण्यात आला आहे तरी देखिल सोमवारी बाजार पेठ मध्ये वीजेचा लपंडाव सुरू आहे आहे वेण्णा नदीचे पाणी नदी पात्रा बाहेर आल्या मुळे लिंगमळा परिसराला नदीचे स्वरूप प्राप्त झाले आहे

गत चार दिवसात पावसाने दाणादाण उडवली असून जनजीवन विस्खळीत झाले आहे अश्या धुवाधार पावसात देखील वर्षा पर्यटनासाठी पर्यटकांची रेलचेल अनुभवायास मिळत असून सोमवारी देखिल हौसी पर्यटकांनी पर्यटनाचा आनंद घेतला

सोमवारी सकाळ पासून मुसळधार पाऊसाची संततधार सुरूच होती महाबळेश्वर मधील मुख्य बाजारपेठ मध्ये पावसामुळे शुकशुकाट जाणवू लागला होता तरी देखिल पावसाळी हंगामाचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी पर्यटकाची तुरळक गर्दी दिसून येत होती. महाबळेश्वर टॅक्सी युनियण तर्फे मान्सून टुर पर्यटकासाठी ठेवण्यात आली असून महाबळेश्वरातील श्री क्षेत्र महाबळेश्वर, केटस पॉईट लिंगमळा धबधबा, गणपती मंदिर, प्लॅटो पॉईट किंग चेअर मेटगुताड मध्ये वेण्णा मिनी डॅम अशा विविध ठिकाणी पर्यटकाना आकर्षित करण्यासाठी स्थानिक ट्रॅक्सी संघटनेकडून पावसाळी हंगाम पर्यटकाला आकर्षित करण्यात येत आहे मुसळधार पावसाच्या सरी मध्ये पर्यटक, दुचाकी स्वार पाऊस अंगावर झेलण्यासाठी अन् धुक्याच्या दुलईचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी काही हौशी पर्यटकांची पर्यटन नगरीकडे वळू लागली आहेत.

## 'पांचगणी विद्यालयात' इंटर स्कूल संजीवन फुटबॉल स्पर्धा २०२४' चे आयोजन




**वाई :** पाचगणी (ता. महाबळेश्वर) येथील १0२ वर्षाचा टप्पा गाठलेल्या संजीवन विद्यालयाच्या वतीने जिल्हास्तरीय' इंटर स्कूल आंतरशालेय फुटबॉल स्पर्धा २0२४' चे आयोजन करण्यात आले आहे.

१७ वर्षाखालील मुलांच्या होणाऱ्या या स्पर्धा मंगळवार २३ जुलै व बुधवार २४ जुलै अखेर संजीवन विद्यालयाच्या फुटबॉल मैदानावर होत असल्याची माहिती संजीवन विद्यालयाच्या संचालिका शाशिताई ठकार यांनी दिली आहे.

संजीवन विद्यालयाच्या वतीने सातारा जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमांच्या सर्व शाळांना या स्पर्धेच्या सहभागासाठी नियंत्रित केले आहे. यामध्ये सुमारे २0 संघ सहभागी होतील अशी माहिती आयोजकांनी दिली आहे. या स्पर्धेला सातारा जिल्हा फुटबॉल असोसिएशनची मान्यता आहे.

# पिंपोडे बुद्रुक प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय थाई बॉक्सिंग स्पर्धेत यश

### राआळंदी पिंपरी-चिंचवड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी

**कोरेगाव :** पिंपोडे बुद्रुक ता.कोरेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय थाई बॉक्सिंग स्पर्धेत यश मिळवलें आहे. सर्व खेळाडूंनी रौप्यपदकाची कमाई केल्याने पुढील आठवड्यात आळंदी पिंपरी-चिंचवड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी या खेळाडूंची निवड झाली आहे.

सातारा जिल्हा थाई बॉक्सिंग असोसिएशन व ज्ञानदीप स्कूल व ज्यु. कॉलेज वाई यांनी आयोजित केलेल्या १८ वी जिल्हास्तरीय थाई बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धा वाई येथे नुकतीच संपन्न झाली. ६ ते ८ वर्षाखालील २२ किलो वजनी गटांमध्ये शौर्य दिंगबर निकम,२५ वजनी गटांमध्ये आरव अमित वाघांबरे,९ ते ११ वर्षांखालील ३२ वजनी गटांमध्ये समर्थ मंगेश लेंभे या तिघांनी जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक व रौप्यपदक



मिळवले. यशस्वी खेळाडूंचे सरपंच दिपिका लेंभे, उपसरपंच रणजित लेंभे,शालेय समितीचे अध्यक्ष दिगंबर निकम,मुख्याध्यापिका रजनी गंगावणे, जिमखाना असोसिएशनचे अध्यक्ष संदीप कदम,सचिन लेंभे, ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, पदाधिकारी, शाळेचे शिक्षक, असोसिएशनचे आजी -माजी खेळाडू व ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले.

**आळंदी येथे राज्यस्तरीय स्पर्धे साठी निवड**

**दि.२६ ते २८ जुलै रोजी (आळंदी) पिंपरी -चिंचवड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय थाय बॉक्सिंग स्पर्धेसाठी या सर्व खेळाडूंची निवड झाली आहे.**

# कोरेगावच्या प्रभाग १२ पुन्हा एकदा झगमगणार पथदिवे बसविण्यासाठी चतुर्थी ग्रुपचा पुढाकार

**मुख्याधिकाऱ्याचे आश्वासन**

कोरेगाव : कोरेगाव नगर पंचायतिच्या प्रभाग १२ मधील पथदिवे राजकिय वादातून हटविण्यात आल्याने संपुर्ण प्रभागात अंधारमय झाला आहे. परंतु या प्रभागत पुन्हा पथदिवे सुरू करण्यात यावेत म्हणून प्रामुख्याने महिलानी चतुर्थी ग्रुपचे अध्यक्ष गणेश भोसले यांच्याकडे मागणी केल्याने प्रभाग १२ मधील पथदिवे सुरू करण्यासाठी चतुर्थी ग्रुपने कोरेगाव नगर पंचायतिच्या मुख्याधिकारी विजया घाडगे यांच्याकडे मागणी केली असता याबाबत चौकशी करून योग्य तो निर्णय घेऊ मत मुख्याधिकारी घाडगे यांनी गणेश भोसले यांच्याशी बोलताना मत व्यक्त केले.

याबाबत अधिक माहिती अशी की, एका सामाजिक कार्यकर्त्याने एका माजी नगरसेवकाच्या घरावर पथदिवे लावण्यात आल्याच्या संशय घेऊन प्रभाग १२ व प्रभाग १३ मध्ये असलेलं अनधिकृत पथदिवे हटविण्यात यावेत म्हणून थेट जिल्ह्याधीकाऱ्यांना निवेदन दिल्यानंतर कोरेगाव नगर पंचायतीने प्रभाग १२ व १३ मधील पथदिवे ताबडतोब हटविले. पथदिवे हटविण्यात आल्यानंतर दोन्ही प्रभाग अंधारमय झाले आहेत. प्रभाग १२ मधील अनेक महिलांनी चतुर्थी ग्रुपचे अध्यक्ष गणेश भोसले यांच्याकडे तक्रार करत पथदिवे बसविण्याची मागणी केली. पथदिवे नसल्याने



रात्रीच्या अंधाराचा फायदा अनेक भुरटे चोर घेत असून प्रभागात चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. रात्रीच्या अंधारात एकट्या महिलेला रस्त्यावरून चालत असताना घाबराहट होत आहे. प्रभाग अंधारमय झाल्याने सोनसाखळी चोरांचे प्रमाण हळूहळू वाढू लागले आहे.

याशिवाय प्रभाग १२ मध्ये शेतीचे प्रमाण अधिकचे असल्याने झाडाझुडुपांचे प्रमाणही जास्त असल्याने नाग, घोणस, धामण, मण्यार आदी विषारी सापांचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे या प्रभागात पथदिव्यांची अधिक गरज असताना या प्रभागात जागरूक लोकप्रतिनिधी, नगरसेवक, सामाजिक कार्यकर्त्यामध्ये चांगलेच राजकारण रंगल्याचे दिसत आहे एकमेकांची जिरवीण्याच्या नादात पथदिव्यांविना महिला, नागरिकांची हाल होत आहे. त्यामुळे या विरोधकानी निवडणुकीपुरते राजकारण केले पाहिजे अशी अपेक्षा गणेश भोसले यांनी बोलताना व्यक्त केली.

नगर पंचायतिच्या नगराध्यक्षा दीपाली बर्गे, उपनगराध्यक्ष सुनील बर्गे तसेच मुख्यधिकारी विजया घाडगे यांनी प्राधान्याने आमच्या प्रभाग १२ मध्ये लक्ष घालून पथदिवे बसविले पाहिजेत अशी अपेक्षा नागरिकांमधून होत आहे.

**निवडणूकीपुरते राजकारण हवे**

लोकप्रतिनिधी, नगरसेवक तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी निवडणूकीपुरते राजकारण केले पाहिले विनाकारण नागरिकांना त्रास होईल असे वागू नये अन्यथा त्यांना निवडणुकीत जनता धडा शिकवील्याशिवाय राहणार नाही. - गणेश भोसले, अध्यक्ष चतुर्थी ग्रुप.

**पथदिवे बसविण्यासाठी लक्ष घालू**

पथदिवे नसल्याने नागरीक महिलांना त्रास होत असेल तर चतुर्थी ग्रुप व नागरिकांनी दिलेल्या निवेदनाची दखल घेऊन प्रभाग १२ मध्ये पथदिवे बसविण्यासाठी आपण लक्ष

# सातारा व कराड शहरात उच्च दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत

## खासदार उदयनराजे भोसले यांची जिल्हा प्रशासनाला सूचना

सातारा : सातारा व कराड शहरात नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दोन्ही शहरांचे एन्ट्री पॉईंट आणि वर्दळीच्या ठिकाणी उच्च दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत अशी महत्त्वपूर्ण सूचना खासदार उदयनराजे भोसले यांनी जिल्हा नियोजन समितीकडे केली आहे. या कामी तातडीने जिल्हाधिकारी उपलब्ध करावा अशी मागणी त्यांनी पत्रकाद्वारे केली आहे.

जलमंदिर येथून प्रसिद्ध झालेल्या पत्रकात नमूद आहे की सातारा व कराड दोन शहरे जिल्ह्याच्या नव्हे तर पश्चिम महाराष्ट्राच्या विकासाची केंद्रबिंदू मानली जातात .त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था व सातारा जिल्हा पोलीस यांच्या माध्यमातून सातारा व कराड शहरात येणाऱ्या सर्व मार्गासह दोन्ही शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी कॅमेरे बसवले जावेत तसेच कराड शहरांमध्ये वाहनांची नंबर प्लेट कॅच करतील असे उच्च दर्जाचे कॅमेरे बसवले जाणे गरजेचे आहे जेणेकरून सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि पोलिसांना गरज पडली तपासाच्या दृष्टीने त्याचा उपयोग होऊ शकेल. दोन्ही शहरालगत औद्योगिक महामंडळाचा परिसर आहे दोन्ही शहरांमधून पुणे बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग जातो येथील दैनंदिन उलाढाल व वाहतुकीची बद्दल प्रचंड प्रमाणात आहे .सार्वजनिक सुरक्षिततेसाठी सातारा शहरांमध्ये ३५ ठिकाणी कॅमेरे बसवण्यात आले होते पण बहुतांश कॅमेरे हे बंद आहेत सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा एक्सेस सातारा जिल्हा पोलिसांकडे आहे त्याचे नियंत्रण पोलीस मुख्यालयातून होत आहे सदरचे कॅमेरे कोणतीही घटना कॅप्चर करू शकत नाही.

सातारा शहर व कराड शहर दोन्ही शहरांच्या एन्ट्री पॉइंटवर वर्दळीच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जावेत १ जुलै २0२४ पासून भारतीय न्याय संहिता अधिनियम लागू झाला असून यामध्ये ऑडिओ व्हिडिओ रेकॉर्डिंग सक्षम पुरावा ग्राह्य मानला गेला आहे त्यामुळे दोन्ही शहराचे शहरात येणारे रस्ते महत्त्वाची चौक संवेदनशील असणारी ठिकाणे यांचा पोलीस प्रशासनाने अहवाल मागवून तेथे हाय रिझोल्युशनचे एनपीआर कॅमेरे बसवले गरजेचे आहे. त्यासाठी जिल्हा नियोजन समितीने तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, अशाच पद्धतीने टप्प्याटप्प्याने पुढील काळात जिल्ह्यातील महत्त्वाच्या शहरांमध्ये यंत्रणा कार्यान्वित करणे बाबत नियोजन करावे अशी स्पष्ट सूचना उदयनराजे यांनी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिव जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांना केली आहे.

## "मनोज जरांगेंसाठी लाडका आंदोलक योजना आणा", लक्ष्मण हाकेंचा खोचक टोला

**मुंबई :** राज्यात गेल्या काही दिवसांपासून मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न चर्चेत आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी केली आहे. त्यासाठी मनोज जरांगे यांनी अनेकदा उपोषणही केलं. आता मराठा समाजाच्या आरक्षणासाच्या मागणीसाठी पुन्हा एकदा मनोज जरांगे यांनी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे उपोषण सुरु केलं आहे. दुसरीकडे ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नांसदर्भात लक्ष्मण हाके यांनी जनआक्रोश यात्रा सुरु केली आहे.

त्यामुळे मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न पुन्हा तापला आहे. लक्ष्मण हाके यांनी आज जनआक्रोश यात्रेदरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शरद पवार यांच्यासह मनोज जरांगे पाटील यांच्यावर हल्लाबोल केला.

## आ. पृथ्वीराज चव्हाण यांनी पालिकेच्या पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांचे मानले आभार

**कराड :** कराड शहरातील पाणी पुरवठा टंचाईची परिस्थिती निर्माण झाल्यापासून ते कराड शहराला पाणी पुरवठा पूर्ववत करेपर्यंत नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी जे अहोरात्र काम केले आहे त्यांच्या या कामाबद्दल माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण यांनी लोकप्रतिनिधी या नात्याने पाणी पुरवठा विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांचे नगरपालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्रात जाऊन आभार मानले.

कराड शहरातील पाणी पुरवठा खंडित झाल्यानंतर आ. पृथ्वीराज चव्हाण यांनी पालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्रात तातडीने संबंधित सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांची मिटिंग घेऊन आढावा घेत ५ महत्वाच्या सूचना केल्या. त्यां ५ सूचनापैकी ३ सूचनाची तातडीने अंमलबजावणी पालिकेकडून केली गेली. जुने जॅकवेल तातडीने सुरु करून तात्पुरती व्यवस्था उभी केली गेली व त्या माध्यमातून शहराला पाणी पुरवठा काही प्रमाणात सुरु झाला या प्रक्रियेत कराड शहराला टँकरच्या माध्यमातून पालिकेचे कर्मचाऱ्यांनी काम केले तसेच जल शुद्धीकरण केंद्रातून शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी अहोरात्र कष्ट केले त्याबद्दल लोकप्रतिनिधी या नात्याने कृतज्ञतेच्या भावनेतून आ. पृथ्वीराज चव्हाण यांनी जलशुद्धीकरण केंद्रामध्ये प्रत्यक्ष भेट देऊन कर्मचाऱ्यांचे आभार मानून संवाद साधला.

## पुणे येथे क्रांतीदिनी ट्रॅक्टर मोर्चा

**सातारा :** औद्योगिक मालाचे दर वाढवताना शेतमालाचे दर मात्र कमीत कमी ठेवण्याचा सरकार प्रयत्न करत आहे. निर्यातबंदीमुळे शेतमालाला भाव मिळेनासा झाला आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्येकडे वळत आहे.

ही राज्याची विदारक स्थिती आहे. दुसऱ्या बाजूला शेतकऱ्याला किसान योजनेचे वर्षाला सहा हजार देता आणि खते बियाणे यातून लाखो रुपयांचा जीएसटी घेता.

शेतकऱ्याच्या मालाला हमीभाव द्या, शेतकरीच तुम्हाला पैसे देईल. शेतकऱ्यांना तसेच बहिणींना दीड हजार रुपये राज्य आणि केंद्र सरकारच्या भिकवादी योजना आता नकोत.

# राज्यात यंदा सत्तांतर होणारच - पृथ्वीराज चव्हाण



**सातारा :** राज्यात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढले असून याला मोदी सरकारचे चुकीचे धोरण जबाबदार आहे. महायुतीचे सरकार जात नाही तोपर्यंत इथला शेतकरी सुधारणार नाही आणि शेतकरी विकासाचा अजेंडा घेऊनच आम्ही निवडणूक लढणार असून यंदा सत्तांतर होणारच, असा विश्वास माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केला.

येथील विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. आता सत्तांतर होणार असल्याची चाहूल लागल्याने भाजपच्या महाअधिवेशनात देवेंद्र फडणवीस यांनी पक्षाच्या आदेशाची वाट न पाहता विरोधकांना ठोकून काढा, अशी मुक्ताफळं उधळली, अशी विधानं करणं गृहमंत्र्याला शोभत नसून त्यांना ही भाषा शोभत नाही. त्यांनी राजीनामा दिला पाहिजे.

महाराष्ट्र सलग तीन वर्षे झाली शेतकरी आत्महत्येमध्ये पहिल्या क्रमांकावर असून हे भूषणावह नसल्याचे ते म्हणाले.

आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या मुद्द्यावरून चव्हाण यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लक्ष्य केले. या गैरव्यवहाराची जबाबदारी कोण घेणार? असा सवाल विचारत यात कोणाकोणाचा सहभाग आहे, हे पाहण्यासाठी सीबीआय चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली. आरएसएस कार्यालयात जाण्यावर सरकारी कर्मचार्यांची बंदी उठवल्याबद्दलही त्यांनी नाराजी व्यक्त केली.

# कोयना नदीवरील चारही योजना इंटरलिंक करण्याची आवश्यकता : आ. पृथ्वीराज चव्हाण

**कराड :** कराड शहरात जो पाणीपुरवठा विस्कळीत झाला तो महामार्गाच्या चुकीच्या कामामुळे घडलेल्या अपघातामुळे मुख्य पाईप वाहून गेली हे स्पष्ट कारण असले तरी असे अपघात पुन्हा घडू नये आणि जरी घडला तरी शहराला होत असलेला पाणी पुरवठा खंडित होऊ नये यासाठी कोयना नदीवरील कराड, मलकापूर, वारुंजी व उंडाळे या योजनांचे इंटरलिंकिंग करणे गरजेचे असल्याचे मत माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण यांनी मांडले. त्यांनी पुन्हा एकदा कराडच्या पाणी प्रश्नाबाबत पालिकेच्या व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून कामाचा आढावा घेतला. तसेच मिटिंग नंतर जलशुद्धीकरण केंद्राला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी मुख्याधिकारी, एमजीपी चे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले कि, महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी कराड नगरपालिके सोबत समन्वयच ठेवला नसल्याने पाणी प्रश्न उदभवला. जुन्या जॅकवेलची यंत्रणा चालू केल्यानंतर शहराला ४0% पाणी पुरवठा सुरु झाला आहे. वारुंजी येथील जॅकवेल पुन्हा चालू करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. पण तो निर्णय होईपर्यंत पूर्ण क्षमतेने कराड शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी नवीन पुलावरून पाईपलाईन आणली जाईल

हे काम जिल्हाधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली पूर्ण होणार आहे. येत्या १0 ते १५ दिवसात शहराचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल. पालकमंत्री व जिल्हाधिकारी यासाठी प्रयत्नशील आहेत त्यांचे सहकार्य मिळतच आहे. शहराची लोकसंख्या वाढत असून त्यामुळे शहराला १00% पर्यायी व्यवस्था असणारी पाणीपुरवठा योजना सुरु करण्याची आवश्यकता आहे. असे आ. चव्हाण म्हणाले. तसेच वारुंजी येथील बंधाऱ्याची उंची वाढविण्याची गरज आहे जेणेकरून टेम्भू योजनेचे अडवलेल्या पाण्याची फुग मागे राहून अशुद्ध पाणी उचलले जाऊ नये यासाठी वारुंजी येथील बंधाऱ्याची मागणी विधानसभेत केली होती त्यावर उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा विषय मार्गी लावण्यासाठी स्वतंत्र मिटिंग लावण्याचे आश्वासन दिले होते ती योजना जर कार्यान्वित झाली तर कराड शहराला शुद्ध व स्वच्छ पाणी मिळेल.



**कोयना धरणातून थेट पाईपलाईन योजना**

**पालिकेच्या व एमजीपीच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर कराड शहरासाठी कोयना धरणातून थेट पाईप लाईन योजना उपक्रम केला तर फक्त कराड शहरालाच नव्हे तर कोयना नदी काठच्या सर्व गावांना स्वच्छ पाणी पुरवठा करता येईलच पण त्यासोबतच गुरुत्वाकर्षणमुळे कमी खर्चात राबविता येऊ शकेल. कोल्हापूरला अशीच योजना मुख्यमंत्री असताना मंजूर केली होती ती आता पूर्ण झाली आहे.**

# विधानसभेला स्वराज्य आणि आंबेडकर एकत्र येणार? संभाजीराजेंचे स्पष्ट संकेत

**मुंबई :** विधानसभा निवडणुका जवळ आल्याने प्रत्येक राजकीय पक्ष मोर्चेबांधणी करत आहे. नेत्यांच्या भेटीगाठी घेतल्या जात आहे. काही दिवसांपूर्वीच राज्यात तिसरी आघाडी उभी करणार असल्याची घोषणा शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी केली होती. ही आघाडी अस्तित्वात येईल की नाही माहीत नाही. मात्र, आता राज्यात नवीन समिकरण जुवळण्याची शक्यता आहे. स्वराज्य पक्षाचे संस्थापक माजी खासदार संभाजीराजे यांनी मुंबईत येथे बोलताना आंबेडकर यांना सोबत घेणार असल्याचे संकेत दिले आहेत.

**संभाजीराजे आणि आंबेडकर सोबत येणार?**

बहिष्कृत हितकारिणी सभेच्या शताब्दी महोत्सवानिमित्त मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना छत्रपती संभाजीराजे यांनी डॉ. राजरत्न आंबेडकर यांना राजकारणात सक्रिय होण्याचे जाहीर आवाहन केले असून, छत्रपती संभाजीराजे व आंबेडकर आगामी विधानसभा निवडणुकीस एकत्रितपणे सामोरे जाऊ शकतात, याचे स्पष्ट संकेत छत्रपती संभाजीराजे यांनी आपल्या भाषणातून दिले. संभाजीराजे यांना आपण म्हणाल तिथे येईन असा प्रतिसाद देत डॉ. राजरत्न आंबेडकर यांनी देखील या शक्यतेस दुजोरा देत होकार दिला.

**विधानसभा निवडणुका कधी होणार?**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकतेच पुण्यात बोलताना ऑक्टोबरचा शेवटचा आठवडा किंवा नोव्हेंबरमध्ये विधानसभा निवडणुका होतील, असे संकेत दिले आहेत. महाराष्ट्रातील विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबर या दिवशी संपणार आहे. हरियाणा राज्यातील विधानसभेची मुदतही ३ नोव्हेंबरपर्यंत आहे. त्यामुळं या २ राज्यातील विधानसभा निवडणुकीचे नियोजन निवडणूक आयोग लवकरच जाहीर करेल अशी शक्यता वर्तवली जात आहे.

विधानसभेची मुदत संपण्याआधी किंवा त्या तारखेच्या दुसऱ्या दिवशी नवी विधानसभा अस्तित्वात येणे गरजेचे असते. या नियमानुसार महाराष्ट्रात आणि हरियाणात दिवाळीपूर्वी किंवा ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यात नवीन विधानसभा अस्तित्वात येणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र आणि हरियाणाची विधानसभा निवडणूक २००९ पासून एकाच वेळी होत आहे. दोन्ही विधानसभांची मुदत २३ दिवसांच्या अंतराने संपत असल्यामुळे नियमानुसार एकत्र निवडणूक घेणे आवश्यक आहे. यंदा दिवाळी २९ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर या कालावधीत आहे. सणासुदीच्या काळात निवडणुका घेतल्या जात नाहीत. वास्तविक दिवाळीनंतर राज्यात विधानसभेची निवडणूक घेण्यास बराच कालावधी मिळतो.

# शिरोळ तालुक्यातील १५ हजार विद्यार्थी अजूनही गणवेशापासून वंचित

## एकाच ठेकेदाराच्या नेमणुकीमुळे गणवेश वितरणाला होतो विलंब

**शिरोळ :** सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण गणवेश देऊन जिल्हा परिषदेतील विद्यार्थी गुणवत्ताधारक बनला पाहिजे या हेतूने शासनाने वेगळी मोहीम राबवली आहे. मात्र, जून महिन्यात शाळा सुरू झाली, सध्या जुलै महिना संपत आला तरी शिरोळ तालुक्यातील १५ हजार विद्यार्थी अजूनही गणेशापासून वंचित असल्याने संबंधित ठेकेदाराच्या दुर्लक्षामुळे पालकातून तीव्र संताप व्यक्त होत आहे.



**चालू वर्षासाठी मुला-मुलींच्या गणवेशाचा ठेका राज्यातील एकाच ठेकेदाराकडे देण्यात आला आहे. एकाच ठिकाणाहून राज्यात सर्वत्र गणवेशाचे वितरण होणार असल्याने विद्यार्थ्यांना काही काळ गणवेशापासून वंचित रहावे लागत आहे. सध्या शिरोळ तालुक्यातील केंद्रात गणवेशाचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित केंद्रातही लवकरच गणवेशासाठी पाठपुरावा सुरू असून तेथेही गणवेश तातडीने वाटप करण्यात येईल.**
**- भारती कोळी, गटशिक्षणाधिकारी शिरोळ**

सध्या शिरोळ तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांची संख्या १६३ जिल्हा परिषद शाळांची संख्या आहे. या शाळेत मुले व मुली मिळून अशी १८ हजार ९७१ अशी संख्या आहे. यापैकी सर्वांना पाठ्यपुस्तके मिळाले आहेत मात्र, गणवेशापासून अद्यापही १५ हजार ४६८ विद्यार्थी विद्यार्थिनी वंचित असल्याने शासनाच्या योजनेचा घोळ पालकांचा तीव्र संताप आला आहे. एकीकडे जिल्हा परिषद शाळांचा दर्जा वाढवण्यासाठी शासन वेगवेगळे प्रयत्न करत असताना ठेकेदाराच्या दुर्लक्षामुळे विद्यार्थ्यांना गणवेश मिळत नसल्याने पालक वर्गातून उलट सुलट चर्चा सुरू आहे.

शिरोळ तालुक्यामध्ये केंद्र शाळा अंतर्गत ग्रामीण भागामध्ये एकूण १२ केंद्र आहेत. तर शहरी भाग जयसिंगपूर या ठिकाणी एक केंद्र असे एकूण १३ केंद्र शिरोळ तालुक्यात आहेत. यापैकी अब्दुललाट, दत्तवाड, अकिवाट या तीन केंद्रशाळे अंतर्गत येणाऱ्या शाळांना शासनाकडून विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले आहे. तर बाकीचे १० केंद्र शाळा अंतर्गत येणाऱ्या शाळांना एक महिना ओलांडून गेला तरीही शासनाकडून अद्याप विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले नाही. पूर्वी स्थानिक ठेकेदाराकडून शाळेला गणवेश वाटपाचा ठेका देण्याचा अधिकार होता. मात्र आता महाराष्ट्रात एकाच ठेकेदाराला गणवेश वाटपाचा ठेका दिला आहे. यामुळे शालेय गणवेश वाटपाचा फज्जा उडत आहे. महाराष्ट्र शासन विविध योजना शासन स्तरावर जाहीर करत आहे काही योजना पूर्ण ताकतीने यशस्वी होत आहेत. मात्र, शालेय गणवेश योजना ती अत्यंत महत्त्वाची शालेय विद्यार्थ्यांच्या साठी असलेली योजना असूनही शासनाकडून याची अंमलबजावणी होत नसल्याचे सध्या पहावयास मिळत आहे . शालेय विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवसापासूनच नवीन गणवेश नवीन शालेय साहित्य मिळाल्याने विद्यार्थी उत्साहाने शाळेचे जातील असा उद्देश शासनाचा आहे मात्र ठेकादार कडून याची अंमलबजावणी होत नसल्याने पालकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. एकंदरीत शिरोळ तालुक्यातील लोकप्रतिनिधी याबाबत तात्काळ गणवेश वाटप झाले नसलेल्या शाळांना गणवेश वाटप बाबत शासन स्तरावर पाठपुरावा करणे गरजेचे बनले आहे.

# विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास आता सहा महिन्याची मुदत

**मुंबई :** अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना सन २०२४-२५ मध्ये विविध शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थाना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीपर्यत मुदत देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. त्यामुळे आता विशेषत: मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर होणार आहेत.

राज्यात २० फेब्रुवारी २०२४ रोजी विशेष अधिवेशनात महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण अधिनियम (एसईबीसी) २०२४ एकमताने संमत करण्यात आला. या अधिनियमानुसार राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशामध्ये आणि शासकीय व निमशासकीय नोकऱ्यांमध्ये सरळसेवा भरतीच्या पदांमध्ये १० टक्के आरक्षण देण्यात आले. याचा फायदा प्रामुख्याने मराठा समाजाला झाला आहे. एसईबीसी अधिनियमाचा फायदा घेऊन शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यात अडचणी येत होत्या. यामुळे एसईबीसी विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ मिळण्याची मागणी करण्यात येत होती. या मागणीचा सकारात्मक विचार करुन प्रमाणपत्र सादर करण्यास वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्याच्या सहा महिन्यापर्यत मुदतवाढ देण्याचा निर्णय मुयमंत्री शिंदे यांनी घेतला आहे.

# पुण्यात अनधिकृत शाळांविरुद्ध गुन्हा दाखल, २९ शाळांना ठोकले टाळे

**पुणे :** विद्येचे माहेरघर तसेच शैक्षणिक राजधानी असलेल्या पुणे जिल्ह्यात ४९ शाळा या अनधिकृत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली. या शाळा इंग्रजी माध्यमांच्या असून पुणे शहर आणि ग्रामीण भागातील ४५ शाळा या बेकायदेशीर आहेत तर ४ शाळा या नियमबाह्य पद्धतीनं चालविल्या जात आहेत. जिल्हा प्रशासनाच्यावतीनं या शाळांवर कारवाई करत जिल्ह्यातील १० अनधिकृत शाळांवर गुन्हा दाखल तर २९ अनधिकृत शाळा बंद करण्यात आल्या आहेत.

**विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही :** पुणे जिल्ह्यात ४९ शाळा या अनधिकृत असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या सर्वेक्षणात समोर आली होती. यानंतर जिल्हा परिषदेच्या माध्यमातून त्या शाळांना नोटीस बजावण्यात आल्या होत्या. यानंतर ज्या शाळांवर कारवाई करत जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जिल्ह्यातील तसेच शहरातील १० शाळांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे तर २९ शाळा या बंद करण्यात आल्या आहेत. या अनधिकृत शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शेजारच्या शाळेत ट्रान्सफर केले जाणार असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, अशी ग्वाही जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील यांनी दिली आहे.

**शासकीय परवानगी नसताना वर्ग सुरू :** पुण्यातील उंड्री येथील ईरा एज्युकेशन सोसायटीतर्फे संचालित ऑर्किड्स इंटरनॅशनल स्कूलकडे कोणतीही शासनाची परवानगी नसताना इयत्ता पहिली ते दहावीचे अनधिकृत वर्ग चालविले जात होते. या प्रकरणी जिल्हा परिषदेने धडक कारवाई केली असून या स्कूलच्या विरोधात कोंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच अनधिकृत वर्ग चालविले जाण्या प्रकरणी पिंपरी-चिंचवडनंतर पुणे शहरात गुन्हा दाखल झाल्याची दुसरी घटना घडली. अशा अनधिकृत चालणाऱ्या १० शाळांवर जिल्हा परिषदेच्या माध्यमातून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**४९ शाळा अनधिकृत असल्याचं समोर :** याबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील म्हणाले की, पुणे जिल्ह्यात विनापरवानगी तसेच ज्या ठिकाणी परवानगी आहे तिथं शाळा न भरवता दुसऱ्या ठिकाणी शाळा भरणाऱ्या शाळांचं सर्वेक्षण जिल्हा परिषदेच्या माध्यमातून करण्यात आलं होतं. त्यात जिल्ह्यातील ४९ शाळा या अनधिकृत असल्याचं समोर आलं होतं. या शाळांवर क्रमाक्रमाने कारवाई करण्यात येत असून २९ अनधिकृत शाळांवर कारवाई करत त्या बंद करण्यात आल्या आहेत. तसेच ज्या शाळा नोटीसला प्रतिसाद देत नाही अशा शाळांवर देखील गुन्हे दाखल करण्यात येत असून आता पर्यत १० शाळांवर गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचं यावेळी पाटील म्हणाले.

पुण्यातील या शाळा आहेत अनधिकृत :
१) ऑर्किड्स इंटरनॅशनल स्कूल
२) फ्लोरिंग फ्लोरा इंग्लिश मीडियम स्कूल
३) नारायणा ई टेक्नो स्कूल
४) दी गोल्डन इरा इंग्लिश मीडियम स्कूल
५) मेरीगोल्ड इंटरनॅशनल स्कूल
६) ई. एम. एच. इंग्लिश मीडियम स्कूल, सी. टी. ई. एल. इंग्लिश मीडियम स्कूल
७) द टायगर इज इंटरनॅशनल स्कूल,
८) शिव समर्थ इंग्लिश मीडियम स्कूल, दारूल मदिनाह स्कूल
९) टीम्स तकवा इस्लामिक स्कूल अँड मक्तब,
१०) लीगसी हायस्कूल
११) इमॅन्युअल पब्लिक स्कूल

# कागल मतदारसंघात रस्त्यांसाठी ८० कोटी निधी मंजूर

**कोल्हापूर :** कागल, गडहिंग्लज व उत्तूर विधानसभा मतदारसंघात ४० किलोमीटरचे कॉंक्रीट रस्ते होणार आहेत. त्यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून ६० कोटी रुपये निधी मंजूर झाल्याची माहिती पालकमंत्री हसन मुश्रीफ यानी दिली. शिवाय कागलमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे आकडेतील विश्रामगृहासाठी तीन कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे.

;अर्थसंकल्पीय तरतुदींमधून तीन रस्ते आणि कागल येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहासाठीही निधी मंजूर झाला आहे. यामध्ये महत्त्वाच्या तीन रस्त्यांसाठी रुंदीकरणासह डांबरीकरण आरसीसी गटारी व आवश्यक ठिकाणी संरक्षक भिंती यासाठीही निधी मंजूर झाला आहे. त्यामध्ये बिद्री सोनाळी, सावर्डे, केनवडे, गोरंबे व अनुर या रस्त्यासाठी सव्वापाच कोटी रुपये मंजूर आहेत. बिद्री, वाळवे, बाचणी, व्हनाळी, शेंडूर, वंदूर, करनूर या रस्त्यासाठीही साडेचार कोटी रुपये मंजूर आहेत.


# कागल मतदारसंघात रस्त्यांसाठी ८० कोटी निधी मंजूर : पालकमंत्री हसन मुश्रीफ यांची माहिती

कोल्हापूर : कागल, गडहिंग्लज व उत्तूर विधानसभा मतदारसंघात ४० किलोमीटरचे कॉंक्रीट रस्ते होणार आहेत. त्यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून ६० कोटी रुपये निधी मंजूर झाल्याची माहिती पालकमंत्री हसन मुश्रीफ यानी दिली. शिवाय कागलमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे आकडेतील विश्रामगृहासाठी तीन कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे.

;अर्थसंकल्पीय तरतुदींमधून तीन रस्ते आणि कागल येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहासाठीही निधी मंजूर झाला आहे. यामध्ये महत्त्वाच्या तीन रस्त्यांसाठी रुंदीकरणासह डांबरीकरण आरसीसी गटारी व आवश्यक ठिकाणी संरक्षक भिंती यासाठीही निधी मंजूर झाला आहे. त्यामध्ये बिद्री सोनाळी, सावर्डे, केनवडे, गोरंबे व अनुर या रस्त्यासाठी सव्वापाच कोटी रुपये मंजूर आहेत. बिद्री, वाळवे, बाचणी, व्हनाळी, शेंडूर, वंदूर, करनूर या रस्त्यासाठीही साडेचार कोटी रुपये मंजूर आहेत.


# जिल्ह्याच्या पश्चिम भागात पावसाची संततधार कायम

## कराड व पाटण तालुक्यात आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सतर्क, जिल्हयातील धरणांमध्ये ७७.९६ टीएमसी पाणी

**सातारा :** जुलै महिन्याच्या उत्तरार्धात पुष्य नक्षत्रात पावसाने जोर कायम ठेवल्याने जिल्ह्याच्या पश्चिमेकडे कोयना पाणलोट क्षेत्रासह महाबळेश्वर, कराड, पाटण व जावली तालुक्यात मुसळधार सुरू आहे. कराड व पाटण तालुक्यात महसूल व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. जिल्ह्यात सरासरी ४८३ मिमी पावसाची नोंद झाली असून कोयना धरणात ५५.३० टीएमसी पाणीसाठा झाला आहे.

कोयना धरण पाणलोट क्षेत्रात मुसळधार पावसाचा जोर कायम आहे. धरणाच्या पाणीसाठ्यात २४ तासात ३.६६ टीएमसीने वाढ झाली असून, धरणाच्या पाणीसाठ्याने ५१ टक्के क्षमता पूर्ण केली आहे.धरणाचा एकूण पाणीसाठा ५४.४२ टीएमसी झाला असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत धरण पाणलोट क्षेत्रात सरासरी पाऊस जास्त आहे. पावसाचा जोर असाच राहिला, तर धरण लवकरच पूर्ण क्षमतेने भरण्याचा अंदाज आहे. सलग दोन दिवस मुसळधार पावसाने कोयना धरण पाणलोट क्षेत्रासह तालुक्याला झोडपून काढले आहे.

कोयना धरणात २४ तासात ४ टीएमसी पाणीसाठी वाढ, ४८ हजार क्युसेक्स वेगाने पाणी गेल्या २४ तासांत कोयनानगर येथे १०७, नवजाला १२७ आणि महाबळेश्वरला १५८ मिलिमीटर पाऊस झाला आहे. गेल्या २४ तासांत ३.६६ टीएमसी पाणी जलाशयात येऊन धरणाचा एकूण पाणीसाठा ५४.४२ टीएमसी झाला आहे. १०५.२५ टीएमसी एकूण पाणीसाठा क्षमता असणाऱ्या कोयना धरणाचे पाणीसाठ्याचे अर्धशतक आणि ५१.७१ टक्के क्षमता पूर्ण केली आहे.

महाबळेश्वरमध्ये २ हजार मिमी पाऊस, कोयना धरण अर्धशतकाच्या उंबरठ्यावर

यावर्षी आजपर्यंत कोयनानगर येथे २३९३, नवजा २८४७ आणि महाबळेश्वरला २२५९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. धरणाचा एकूण पाणीसाठा ५४.४२ तर उपयुक्त ४९.३० टीएमसी झाला आहे. जिल्ह्याच्या पश्चिम भागातील महाबळेश्वर, सातारा, पाटण, जावळी, वाई, कऱ्हाड या तालुक्यातील बहुतांश भागात पाऊस सुरू आहे. यामुळे ओढे, नाले व नदीच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. दुष्काळी माण, खटाव, फलटण, कोरेगाव, खंडाळा या तालुक्यांतही तुरळक ते मध्यम स्वरूप पाऊस सुरू आहे.

# पन्हाळा ते बुधवार पेठ मुख्य रस्त्यावर बिबट्याचे दर्शन

**पन्हाळा :** पन्हाळगडावर वर्षी सहलीला आलेल्या पर्यटकांना पन्हाळ्यावरुन सोमवारी रात्री कोल्हापूर कडे परत जाताना पन्हाळा मुख्य रस्तावरील जकातनाका ते बुधवारपेठ दरम्यान असलेल्या रस्त्यावरून वीर शिवाकाशीद समाधी दिसते त्या बाजूला जाणाऱ्या लहान बिबट्याचे दर्शन झाले.

पाऊस व दाट धुक्यात हरवलेला पन्हाळगड पाहण्यासाठी नेहमीच गर्दी होते. त्यामध्ये कुटुंबासोबत येणाऱ्या पर्यटकांची संख्या जास्त असते.



**पन्हाळगडाच्या मुख्य रस्त्यावरून जात असलेला बिबट्या**

सोमवारीही असेच कुटुंबासह पन्हाळा दर्शन करून व येथील जेवणाचा आस्वाद घेऊन परतणाऱ्या एका पर्यटक कुटुंबास मुख्य रस्त्याने जकात नाक्यापासून खाली जात असताना रस्त्यावरून दौडत जाणारा पूर्ण वाढ झालेल्या बिबट्याचे दर्शन झाले. हा प्रसंग त्याने कॅमेराबद्द करून त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल केल्याने त्याची सोशल मीडियावर जोरदार चर्चा चालू झाली होती.

या बाबत वनविभागा कडे विचारणा केली असता, वनविभागाने मुख्य रस्त्याच्या वरील बाजूस असलेल्या रेडेघाटी व पावनगड परिसरात बिबट्याचा आधिवास व वास्तव्य आहे.

तेथील बिबट्या नेहमीच खाद्याच्या शोधात मुख्य रस्ता ओलांडून गडाच्या पायाथ्याशी असलेल्या गावांच्या दिशेने नेहमीच जातो त्याठिकाणी राहणाऱ्या बिबट्याचा नेहमीचा मार्ग आहे असे परिक्षेत्र वनाधिकारी अनिल मोहिते यांनी सांगितले.

# पावसाचा जोर कायम; कोल्हापूर - रत्नागिरी महामार्ग बंद

**कोल्हापूर :** जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला असून ७९ बंधारे पाण्याखाली गेले आहेत. पंचगंगा नदी पाणी पातळी ३९ फुटावर अली आहे. ४३ फूट धोका पातळी असल्याने खबरदारी म्हणून अनेक कुटुंबांना स्थलांतरित करण्यात आले आहे दरम्यान पुराचे पाणी रत्नागिरी महामार्गावर आल्यामुळे पोलिसांनी या मार्गावरील वाहतूक दुपारी दोन वाजले पासून पूर्णपणे बंद केलीय.




पावसाचा जोर वाढल्याने आज (मंगळवारी) सकाळीच या रस्त्यावर पुराचे पाणी आले होते. त्यानंतर काही काळ या महामार्गावरील वाहतूक पाण्यातूनच सुरु होती. मात्र पाणी अर्धा फुटावर वाढले असून पाण्याचा वेग प्रचंड असल्यामुळे या मार्गावरील वाहतूक दुपारी दोन वाजल्यापासून पूर्णपणे बंद केली आहे. त्यामुळे या मार्गावरील अनेक वाहने खोळंबली आहेत.

हा महामार्ग बंद झाल्याने वाहने केर्ली येथून जोतिबा - दाणेवाडी - वाघबीळ या पर्यायी मार्गाने वळवण्यात आलीयत. दरम्यान कोल्हापूर - रत्नागिरी महामार्गावरील आंबेवाडी, रेडेडोह, रजपूतवाडी, चिखली फाटा या ठिकाणी रस्त्याच्या कडेला पाणी लागले आहे. याठिकाणी रस्त्यावर एक दोन फूट पाणी आलं तर केर्ली जोतिबा वाघबीळ हा पर्यायी मार्ग सुद्धा वाहतुकीसाठी बंद होण्याची शक्यता आहे.

कोल्हापूर जिल्ह्याची तहान भागवणारे राधानगरी धरण पाणलोट क्षेत्रात देखील मुसळधार पाऊस सुरू असून गेल्या २४ तासात सर्वाधिक ६६.१ मिमी पावसाची नोंद करण्यात आली आहे. धरण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत असल्यामुळे राधानगरी धरण देखील आता ९०% भरलेल असून धरणाच्या विद्युतविमोचनातून १५०० क्यूसेक्स पाण्याचा विसर्ग भोगावती नदीपात्रात सुरू आहे.

# कोल्हापूर येथे पथदर्शी प्रकल्प राबविणार : राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाकडून नागरिकांना सेवा देण्याचे काम सातत्याने सुरू आहे. सामान्य नागरिकांचे नियमित आणि महत्त्वाची सेवा प्रभावीपणे राबविण्यासाठी कोल्हापूर येथे १५ ऑगस्ट २०२४ रोजी पथदर्शी प्रकल्प (पायलट प्रकल्प) राबविण्यात येणार आहे.

या प्रकल्पाचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी आज दिली.

# अंतरवालीमध्ये उपोषणाला बसलेल्या जरांगेंची नवी खेळी?

**जालना :** मराठा समाजाच्या ओबीसी आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगेंनी पाचव्यांदा उपोषणाचे हत्यार उपसलेय. पण, यावेळी त्यांनी सरकारविरोधात थेट एल्गार केल्याचे पाहायला मिळतेय. यातच ओबीसींनी देखील जालन्यातून जनआक्रोश यात्रा सुरू केल्याने पुन्हा एकदा जरांगेंनी भुजबळांना लक्ष्य केल्याचे पाहायला मिळाले. जरांगेंनी थेट येवल्यात आंदोलन करण्याचा इशारा दिल्यामुळे पुन्हा एकदा जरांगे विरुद्ध ओबीसी असा सामना रंगल्याचे दिसतेय.

मनोज जरांगेंनी उपोषणाच्या पहिल्या दोन दिवसात भाजपच्या आमदार प्रसाद लाड आणि आमदार प्रवीण दरेकरांना लक्ष्य केल्यानंतर, जरांगेंनी आता त्यांच्या तोफेचं तोंड पुन्हा एकदा भुजबळांकडे वळवल्याचं दिसतंय. त्याचवेळी ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारेंनी जनआक्रोश यात्रा काढत पुन्हा एकदा जरांगेंसमोर थेट आव्हान उभं केलं. या आंदोलनानंतर जरांगेंनी भुजबळांना लक्ष्य करत, भुजबळांच्या येवल्यातच आंदोलन करण्याचा इशारा आता जरांगेंनी दिला.

मी कधीही आंदोलन येवल्याला हलवू शकतो, भुजबळ माझ्याकडे आंदोलने करायला लावत आहेत. मग मी कधीही येवल्याला आंदोलन करू शकतो, असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे.

सध्या अंतरवाली सराटीत उपोषण करणाऱ्या जरांगेंनी उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी सत्ताधाऱ्यांचा खरपूस समाचार घेतला, यावेळी त्यांनी सरकारच्या दुर्लक्षावर निशाणा साधला. सरकार भुजबळांच्या इशाऱ्यावर काम करत असल्याचा आरोप करत, जरांगेंनी हाकेंच्या ओबीसी जनआक्रोश यात्रेवरुनही भुजबळांना लक्ष्य केलं.